# माहितीच्या अधिकराच्या संबंधात नेहमी विचारण्यात येणारे प्रश्न

प्रश्न १. माहिती म्हणजे काय ?

उत्तर - माहिती म्हणजे, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य होय. यात, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, मते, सल्ले, वृत्तपत्रार्थ प्रकाशने, परिपत्रके, आदेश, रोजवही, करार, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपात धारण केलेले आधार सामग्रीचे साहित्य यांचा समावेश होतो. यामध्ये, त्यात्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये सार्वजनिक प्राधिकरण्याद्वारे मिळविता येऊ शेकेल अशा कोणत्याही खाजगी संस्थेशी संबंधित माहितीचा देखील समावेश आहे.

प्रश्न २. सार्वजनिक प्राधिकारण म्हणजे काय ?

उत्तर- सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ, संविधानाद्वारे किंवा त्यान्वये, संसदेने किंवा राज्य विधान मंडळाने केलेला अन्य कोणत्याही कायद्याद्वारे; किंवा केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन केलेले किंवा घटित केलेले कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था (निकाय) किंवा स्वयंशासित संस्था, असा आहे. केंद्र सरकारची किंवा राज्य शासनाची मालकी असलेल्या, त्यांचे नियंत्रण असलेल्या किंवा त्यांच्या कडून भरीव अर्थसहाय्य मिळत असलेल्या संस्था (निकाय) देखील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्ये अंतर्गत येतात. शासनाद्वारे संस्थांना (निकाय) किंवा अशासकीय संघटनांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे अर्थसहाय्य केले जाऊ शेकते.

प्रश्न ३. जनमाहिती अधिकारी कोण असतो ?

उत्तर - सार्वजनिक प्राधिकारणांनी, त्यांच्या काही अधिकाऱ्यांना जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेले असते. माहितीचा अधिकार अधिनियमान्वये माहिती मागणाऱ्या व्यक्तीस माहिती देण्यासाठी ते जाबाबदार आहेत.

प्रश्न ४. राज्य शासनाच्या सार्वजनिक प्राधिकरणांकडून माहिती मागण्यासाठी किती शुल्क आहे ?

उत्तर - माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अर्जाकरिता रु.१० इतके शुल्क विहित केले आहे. जर अर्जदार, दारिद्र्यरेषेखालील प्रवर्गातील असेल तर, त्याने कोणतेही शुल्क प्रदान करणे आवश्यक नाही. तथापि, तो दारिद्र्यरेषेखालील प्रवर्गातील असल्याच्या पुष्टयर्थ त्याने पुरावा सादर केला पाहिजे.

प्रश्न ५. अर्जाचा कोणताही विनिर्दिष्ट नमुना आहे काय ?

उत्तर - माहिती मागण्यासाठी अर्जाचा कोणताही नमुना विहित केलेला नाही. साध्या कागदावर अर्ज करता येईल. तथापि, अर्जात, अर्जदाराचे नाव व पोस्टाचा संपूर्ण पत्ता लिहिला पाहिजे.

प्रश्न ६. माहिती मागण्यासाठी कोणतेही कारण देणे आवश्यक आहे काय ?

उत्तर - माहिती मागणाऱ्याने माहिती मागण्यासाठी कोणतेही कारण देण्याची आवश्यकता नाही.

प्रश्न ७. माहिती मागण्याची पध्दती काय आहे ?

उत्तर - अधिनियमाखाली कोणतीही माहिती मिळवण्याची इच्छा असलेल्या नागरिकाने, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या जनमाहिती अधिकाऱ्याकडे लेखी इंग्रजीत किंवा हिंदीत किंवा ज्या क्षेत्रात अर्ज करीत आहे त्या क्षेत्रातील राजभाषेत लेखी स्वरुपात अर्ज करावा. अर्ज नेमका व निनिर्दिष्ट असावा. अर्ज सादर करतेवेळी, त्याने विहित शुल्कानुसार अर्जासाठीचे शुल्क भरावे.

प्रश्न ८. माहिती उघड करण्यातून सूट मिळण्याची कोणती तरतूद आहे काय ?

उत्तर - अधिनियमाच्या कलम ८ च्या पोट-कलम (१) व कलम ९ मध्ये उघड करण्यातून सूट असणाऱ्या माहितीचे प्रकार नमूद कले आहेत. तथापि, कलम ८ च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद केली आहे की, पोट-कलम (१) अन्वये उघड करण्यातून सूट असलेली माहिती अथवा शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ याअन्वये उघड करण्यातून सूट असलेली माहिती संरक्षितहितसंबंधास पोहचणाऱ्या हानी पेक्षा लोकहिताच्या दृष्टीने उघड करणे आश्यक असेल तर, ती उघड करता येऊ शकेल.

प्रश्न ९. माहितीचा अधिकार अधिनियमाखालील अर्ज दाखल करण्यासाठी अर्जदारास कोणतेही सहाय्य उपलब्ध आहे काय ?

उत्तर - जर एखादी व्यक्ती लेखी विनंतीअर्ज करण्यास अक्षम असेल तर ती, तिचा अर्ज लिहून देण्यासाठी जनमाहिती अधिकाऱ्याची मदत घेऊ शकेल आणि जन माहिती अधिकाऱ्याने तिला वाजवी सहाय्य द्यावे. जेव्हा सेवेदनाहिन दिव्यांग व्यक्तीस कोणत्याही कागदपत्रांच्या संबंधात मदत करण्याचा निर्णय घेतला असेल त्याबातीत, जनमाहिती अधिकारी निरीक्षण करण्यासाठी यथोचित असेल असे सहाय्य करील.

प्रश्न १०.माहिती पुरविण्याची मुदत मर्यादा किती आहे ?

उत्तर - सर्वसाधारणपणे, अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सार्वजनिक प्राधिकारणाकडून अर्जदारास माहिती पुरविण्यात येईल. जर मागितलेली माहिती, एखाद्या व्यक्तीचे जीवित किंवा स्वातंत्र्य यांच्याशी संबंधित असेल तर ती ४८ तासांच्या आत पुरविण्यात येईल.

प्रश्न ११.माहितीचा अधिकार अधिनिमाखाली अपीलाची कोणतीही तरतूद आहे काय ?

उत्तर - जर अर्जदारास ३० दिवसांच्या किंवा ४८ तासांच्याविहित कालावधीत माहिती पुरवण्यात आली नसेल तर, यथास्थिति किंवा त्याला सादर केलेल्या माहितीने त्याचे समाधान झाले नसेल तर, त्यास, जनमाहिती अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी असलेल्या प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल. ज्या दिनांकास माहिती पुरवण्याची ३० दिवसांची मुदत समाप्त होईल त्या दिनांकापासून किंवा ज्या दिनांकास जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेली माहिती किंवा निर्ण प्राप्त होईल त्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत असे अपील दाखल करता येई. सार्वजनिक प्राधिकरणाचा अपील प्राधिकरी ३० दिवसांच्या कालावधीत किंवा अपवादात्मक प्रकरणी अपील प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत उपील निकालात काढील.

प्रश्न १२.माहितीचा अधिकार अधिनियमाखालील दुसरे अपील करण्याची कोणतीही सोय आहे का ?

उत्तर - जर प्रथम अपील प्राधिकाऱ्याने, विहित कालावधीत अपिलावर आदेश संमत करण्यात कसूर केली असेल तर किंवा प्रथम अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशाने अपील कर्त्याचे समाधान झाले नसेल तर, तो प्रथम अपील प्राधिकाऱ्याने ज्या दिनांकास निर्णय दिला असेल त्या दिनांकापासून किंवा अपिलकर्त्यास तो प्रत्यक्षात ज्या दिनांकास प्राप्त झाला असेल त्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे दुसरे अपील करु शकेल.

प्रश्न १३.या अधिनियामाअन्वये तक्रार करता येऊ शकते का ?
येत असल्यास, कोणत्या परिस्थितीत करता येते ?

उत्तर - जर कोणत्याही व्यक्तीस, संबंधित सार्वजननिक प्राधिकरणाने जनमाहिती अधिकाऱ्याची नियुक्ती, न केल्यामुळे अशा अधिकाऱ्याकडे अर्ज सादर करणे शक्य झाले नसेल तर किंवा माहितीचा अधिकार अधिनियमान्वये त्याने मागणी (विनंती) केलेली कोणतीही माहिती पुरविण्यास त्याने नकार दिल्यामुळे किंवा या अधिनियमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत माहिती मिळण्याच्या विनंतीस त्याने प्रतिसाद न दिल्यामुळे किंवा त्याने त्याला जे गैरवाजवी वाटत आहे असे शुल्क भरणे त्योन भाग पाडल्यामुळे किंवा त्याला दिशाभूल करणारी, चुकीची व अपूर्ण माहिती दिली असल्याचा त्याचा विश्वास असल्यास, ती व्यक्ती, त्याबाबत माहिती आयोगाकडे तक्रार करु शकेल.

प्रश्न १४.त्रयस्थ पक्षीय माहिती म्हणजे काय ?

उत्तर - अधिनियमाच्या संबंधात त्रयस्थ पक्ष याचा अर्थ, ज्याने माहिती मिळण्याची विनंती केलेली आहे त्या नागरिका व्यतीरिक्त अन्य व्यक्ती, असा आहे, त्रयस्थ पक्षाच्या व्याख्येत, सार्वजनिक प्राधिकरणाकडे विनंती करण्यात आली आहे त्या सार्वजनिक प्राधिकरणा व्यतिरिक्त अन्य सार्वजनिक प्राधिकरणाचा समावेश होतो.

प्रश्न १५.माहितीचा अधिकार अधिनियामा अन्वये माहिती पुरविण्यापासून सूट देण्यात आलेली कोणतीही (कोणत्याही) संघटना आहे (आहेत) काय ?

उत्तर -होय, दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित गुप्तवार्ता व सुरक्षा संघटनांना, भ्रष्टाचाराचे आरोप व मानवी हक्कांचे उल्लंघन ज्यांच्याशी संबंधित असणाऱ्या माहिती खेरीज, माहिती पुरविण्यातून सूट देण्यात आली आहे.